# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## जनसंपर्क विभाग

जा.क्र.भिनिशमनपा/ ८८०

दिनांक३० /7/2024

प्रति,

विभाग प्रमुख

संगणक विभाग

विषय धोकादायक इमारतींची यादी मनपा संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ मा. आयुक्त सो. यांच्याकडील दिनांक 30/7/2024 रोजी मान्यता

उपरोक्त संदर्भित विषयान्वये कळविण्यात येते की,धोकादायक इमारतींची यादी संकेत स्थावर प्रसिध्द करणेबाबत मा. आयुक्त सो. यांचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार पालिकेच्या संकेत स्थळावर सदर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

(मिलिंद पळसुले)

प्र.जनसंपर्क अधिकारी

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

## धोकादायक / अतिधोकादायक इमारतींबाबत जाहीर सुचना

## सन २०२४-२५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भ विसआ-२१५/प्र.क्र.३४९/नवि-२०, दिनांक ०५ नोव्हेंबर २०१५ नुसार व त्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर म.न.पा.ने निश्चित केलेल्या कार्यपध्दती (एस.ओ.पी.) नुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे संबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणाअंती सी-1, सी-2ए, सी-2बी व सी-3 या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवेळी नोटिसाव्दारे कळविण्यात आलेले आहे. तसेच उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार पोलीस स्टेशनला निर्मनुष्य करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक/ भोगवटदार यांना पुरेशी संधी देवूनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापि काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. सद्यस्थितीत पावसाळा सुरु असून अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करून, विना विलंब सदर अतिधोकादायक / धोकादायक इमारती स्वतःहुन सुरक्षितरीत्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव करणाऱ्या संबंधित नागरिकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरू यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट (Structural Audit) करून घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक/भोगवटादार यांची राहील. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरिक म्हणून आपआपल्या परिसरातील इमारतींवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करून सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी** / Toll Free
**क्रमांकावर संपर्क साधावा.**
**०२५२२-२५००४९**
**१८०० २३३ ११०२**

**भिवंडी नि. शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक/अतिधोकादायक इमारतींची यादी खालील QR Code व लिंकचा वापर करुन पाहता येईल.**

https://bit.ly/3WB2icz